# MT

Seat No. | | | | | | | |

2018 .... .... 1100

MT - MARATHI (SECOND OR THIRD LANGUAGE) (M) - SEMI PRELIM - I - PAPER - I

**Time : 3 Hours** **(Model Answer Paper)** **Max. Marks : 100**

विभाग १ – गद्य

उ.१ अ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.

(१) (i) आकृतिबंध पूर्ण करा. 1




(ii) कोण कोणास म्हणाले ते लिहा. 1




(२) (i) कंसातील योग्य शब्द वापरून रिकामी जागा भरा. 1

सुश्रुतच्या वर्गाची सहल <u>भिलार</u> गावाला नेण्याचे ठरले.

(ii) खालील प्रश्नाचे एका वाक्यात उत्तर लिहा. 1

अरे आम्ही सर्व तुला भेटायाला आलो आहोत, असे सुश्रुतला पुस्तकाच्या वेशातील मुले म्हणाली.

(३) व्याकरण :

(i) उताऱ्यातील दोन सर्वनामे शोधून लिहा. 1

(अ) मी (आ) मला (इ) माझी (ई) तुम्ही (उ) तुम्हाला (ई) तुझी

(i) उताऱ्यातील दोन विशेषणे शोधून लिहा. 1

(अ) काही (आ) चांगली (इ) खूप (ई) आकर्षक (उ) परिणामकारक

(४) **स्वमत :** 2

'वाचाल तर वाचाल' या उक्तीप्रमाणे वाचनाने आपणांस अनेक लाभ होतात. वाचनाने शब्द संपत्ती वाढते. नवनवीन संकल्पना कळतात. विचार प्रगल्भ होतात. लेखक होण्यासाठी या सर्वांचा उपयोग होतो. समाजातील चालीरिती, संस्कृती, नवीन शोध, पर्यटन, शैक्षणिक स्तर यांची माहिती वाचनाने मिळते. विचारांची बैठक पक्की होते. काळाचे भान येते. नव्या जुन्या गोष्टी कळतात. उत्तम विचार समर्थ लेखणीद्वारे प्रगट होतात.

उ.१ **आ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **आकृतिबंध पूर्ण करा.**

(i) **निरंजन सकाळी लवकर उठून या विषयाचा अभ्यास करत होता.** → नागरिकशास्त्र 1

(ii) **चटकन पाठ होतो** → संस्कृतचा श्लोक; **सकाळच्या वातावरणात**; **चटकन कळते** → न कळलेले गणित 1

(२) (i) **कंसातील योग्य शब्द वापरून रिकामी जागा भरा.** 1

गुरुजींचंही <u>**निरंजनवर**</u> खूप प्रेम होतं.

(ii) **खालील प्रश्नाचे एका वाक्यात उत्तर लिहा.** 1

मामाने निरंजनला चिपळूणला मावशीकडे आणून सोडले.

(३) **व्याकरण :**

**खालील विशेषण विशेष्यांच्या जोड्या जुळवा.** 2

| विशेषण | विशेष्य |
|---|---|
| (i) योग्य | (ब) सल्ला |
| (ii) सुखद | (ड) गारवा |
| (iii) पुरेशी | (अ) विश्रांती |
| (iv) प्रसन्न | (क) वातावरण |

(४) **स्वमत :** 2

'लवकर निजे, लवकर उठे त्यास उत्तम आरोग्य लाभे' ह्या वचनानुसार राहाणाऱ्यांना आरोग्यप्राप्ती होतेच व आयुष्यात यशप्राप्तीही होते. लवकर उठल्याने पहाटेच्या वेळेचा सदुपयोगकरता येतो. पहाटे

अभ्यासही छान होतो. केलेला अभ्यास लक्षात राहातो. पहाटे गोंगाट, कलकलाट नसल्याने चित्त एकाग्र होते. पुरेशी झोप झाल्याने शरीर व मन दोन्हीही प्रफुल्लित असतात. हवेत सुखद गारवा असतो. पक्ष्यांचा किलबिलाट असतो. पहाटेची भूपाळी, जात्यावरच्या ओव्या किंवा रेडिओवरची मधुर सनई मन प्रसन्न करते. शांततेत पाठांतर होते. मनन व चिंतन होते. पहाटे कामांची लगबग नसते, वाहनांची ये-जा नसते म्हणून मन स्थिर होण्यास वेळ लागत नाही. एकाग्र मनाने अभ्यास करता येतो.

## अपठित गद्य

उ.१ **इ. खालील उताऱ्याच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **आकृतिबंध पूर्ण करा.** 2

**विद्वत्तेची वैशिष्ट्ये**
- ती क्षणात मिळवता येत नाही.
- जेवढ्या प्रयत्नाने मिळवाल तेवढे प्रभावी व्यक्तिमत्त्व.
- वेळेच्या सदुपयोगाने मिळणारी.
- मिळवण्यासाठी धनसंपत्ती खर्ची घालावी लागत नाही.

(२) **खालील घटनेचा किंवा कृतीचा परिणाम लिहा.** 2

| | घटना/कृती | | परिणाम |
|---|---|---|---|
| (i) | झाडाची मुळे खोल जाणे | (i) | तेवढा झाडाचा पाया भक्कम |
| (ii) | प्रयत्नांनी विद्या मिळवणे | (ii) | तेवढे प्रभावी व्यक्तिमत्त्व |

(३) **व्याकरण :**

(i) **खालील शब्दसमूहाचा तुम्हांला कळलेला अर्थ लिहा.** 1

विजेसारखे चमकणे – एकदाच व्यक्तिमत्त्व घडविणे

(ii) **अधोरेखित शब्दाची जात ओळखा.** 1

संपूर्ण - विशेषण

(४) **स्वमत :** 2

विद्या म्हणजेच ज्ञान. ज्याला ज्ञान प्राप्त होते त्याला समाजातील सर्व सुखे प्राप्त होतात. समाजात त्या व्यक्तीला मान, सन्मान, प्रतिष्ठा, प्रसिद्धी प्राप्त होते. एक प्रकारची वैचारिक कुवत त्याच्यात येते. ज्ञानाने सत्य-असत्य मधला फरक कळतो. नवीन आदर्शांची जाणीव होते. नीतीमूल्यांची जपणूक कशी करावी ते कळते. देश हितार्थ गोष्टी कळू लागतात. देशप्रेम वाढीस लागते. बंधुभाव, राष्ट्रप्रेम वाढीस लागते. त्याला

हव्या असणाऱ्या ठिकाणी काम करण्याची संधी मिळते. योग्य निर्णय क्षमता येते. त्याच्या व्यक्तिमत्त्वात भर पडते. चार-चौघात त्याचे विचार प्रकर्षाने तो मांडू शकतो. आपल्या ज्ञानाचा उपयोग तो इतरांसाठीही करतो.

## विभाग २ – पद्य

उ.२ **अ. खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **आकृतिबंध पूर्ण करा.**

(i) मुठीमध्ये नाही → द्रव्य; शिरेमध्ये नाही → रक्त 1

(ii) असंख्य ज्योतींची → राखण 1

दीनदुबळ्यांचे असे → औक्षण

(२) (i) **कंसातील योग्य शब्द वापरून रिकामी जागा भरा.** 1

जीव, किती हा लहान.

(ii) **खालील प्रश्नाचे एका वाक्यात उत्तर लिहा.** 1

जवानाचे रक्षण असंख्य ज्योतींनी होणार आहे.

(३) देशाच्या सीमेचे रक्षण करणारा सैनिक नेहमीच देशासाठी भूषणास्पद असतो. त्याच्या देशरक्षणाच्या कर्तव्यामुळे देशातील नागरिक सुखाची झोप घेऊ शकतात. अन्यथा परकीय आक्रमण, लढाई या संकटांमुळे आपली सुरक्षितता धोक्यात आली असती. ऊन, पाऊस, थंडी याला सामोरे जाऊन 'देशरक्षण' हेच त्यांचे ध्येय असते. जीवावर उदार होऊन ते सीमेवर न डगमगता उभे असतात. त्यांचे कुटुंब, मुले-बाळे यांना ते महिनोंमहिने भेटत ही नाही. देशरक्षणाच्या कर्तव्यासाठी आप्त स्वकीयांनाही त्यांना भेटता येत नाही. देशरक्षणाच्या कर्तव्यासाठी आप्त स्वकीयांनाही त्यांना भेटता येत नाही. खाजगी आयुष्याचा, सुखांचा संपूर्ण त्याग करुन केवळ सीमेवर हे जवान देशरक्षणासाठी सज्ज असतात. 2

(४) देश हाच देव समजून सैनिक देशाची सेवा करीत असतात. त्यांचे हे काम अतुलनीय आहे. अनेक महिने ते आपले घरदार, कुटुंब सोडून सीमेवर लढत असतात. ऊन, थंडी, पावसाची तमा न बाळगता देशासाठी 2

प्राण अर्पण करायला तयार होतात. अशा वेळेस आम्ही त्यांच्या या गुणांचे कौतुक भेटकार्ड देऊन करु शकतो. १५ ऑगस्ट स्वातंत्र्यदिनी त्यांना शुभेच्छा कार्ड पाठवू शकतो. रक्षाबंधनच्या दिवशी त्यांना राखी पाठवू शकतो. मकर संक्रांतीला सीमेवरच्या जवानांसाठी तीळगुळ पाठवून स्नेह प्रदर्शित करू शकतो. त्यांच्या शहरातील वा गावातील कुटुंबाकडे स्थळभेट देऊन त्यांच्या कुटुंबाची ख्याली खुशाली विचारु शकतो, त्यांच्याशी प्रेमाचे अतुट नाते जोडू शकतो.

उ.२ **आ. खालील कवितेच्या आधारे दिलेल्या सूचनेनुसार कृती करा.**

(१) **आकृतिबंध पूर्ण करा.**

(i) 1




(ii) 1




(२) (i) **खालील प्रश्नाचे एका वाक्यात उत्तर लिहा.** 1

पक्ष्यांच्या मंजुळ नादात झाडांच्या जीवनाचे एक संथ गाणे दडले आहे.

(ii) **कंसातील योग्य शब्द वापरून रिकामी जागा भरा.** 1

पक्षी झाडांचे कुणीच नसतात तरीही झाडं त्याचं असतं.

(३) **पुढील ओळींचे अर्थसौंदर्य स्पष्ट करा.** 2

झाडाची सहकार्याची वृत्ती विलक्षण असते. परोपकाराची भावना त्यांच्या मनात सतत जागी असते. आपल्या सर्वदूर पसरलेल्या फांद्यांमुळे झाड कडक उन्हात वाटसरूंना गारेगार सावली देते त्यांचा थकवा दूर करतं. जणू आपले बाहू पसरवून हे झाड मुसाफिरांना म्हणजे वाटसरूंना आपल्या कवेत घेते, असे वाटते.

(४) झाड कोणत्याही परिस्थितीत घट्ट पाय रोवून उभे असते. वाऱ्याच्या झुळूकीबरोबर पानांच्या सळसळाटीने हसते. पक्ष्यांच्या मंजुळ गाण्याबरोबर जीवनाचे गाणे गाते. आपल्या विशाल सावलीत 2

मुसाफिरांना कवेत घेते. पावसाळ्यात हिरवेगार ताजेतवाने होऊन न्हाऊन निघते. पानझडीनंतर नव्या नवरीसारखा नवीन वेष धारण करते. दातृत्व हा झाडाचा मोठाच गुण आहे. फळे, फुले बहरली की झाडे ती दुसऱ्यांच्या पदरात दान करते. संपूर्ण आयुष्य हिरवगार होऊन जगते. अशाच प्रकारे माणसानेही सहनशीलता, सहकार्याची वृत्ती, कठीण प्रसंगातही घट्ट पाय रोवून ठेवण्याची वृत्ती जोपासली तर त्याचेही जीवन आनंदाने भरून जाईल.

उ.२ (१) **इ. खालील ओळींचे रसग्रहण करा.** 4

'स्वप्न करू साकार' या कवितेत कवी 'किशोर पाठक' यांनी आपल्या भारत देशाच्या उज्ज्वल भविष्याचे सुंदर स्वप्न रेखाटले आहे. ते रेखाटतांना कृषिसंस्कृतीचे महत्त्व आपल्याला पटवून दिले आहे.

कवी म्हणतात की, शेतकऱ्यांच्या कष्टांमुळेच फुलामुलांतून श्रावण हसत असतो. म्हणजेच श्रावण महिन्यामध्ये सारी धरती व तिची बाळे आनंदित होतात. खरे तर ऊनपावसाचा खेळ चालू असणाऱ्या श्रावण महिन्यामध्ये धरती हिरव्या रानांनी, पाना-फुलांनी सजलेली असते. शेतकऱ्यांच्या मेहनतीने, कष्टाने इथली माती म्हणजेच इथली शेते धनधान्याने डोलू लागलेली असतात. धरतीचे हे सौंदर्य पाहून सगळे जण आनंदित होतात. चैतन्यमय, प्रसन्न वातावरण सर्वत्र निर्माण झालेले असते. ज्याप्रमाणे सुदर्शनचक्र फिरले की, दु:खाचा, अडचणींचा नाश होतो आणि सर्वत्र आनंद पसरतो, त्याचप्रमाणे शेतकरी जणू आपल्या कष्टाने चैतन्याचे, आनंदाचे सुदर्शनचक्र फिरवत असतो. त्याच्या मेहनतीमुळेच शेताशेतांतून धान्यरूपी मोत्याचे 'सुदर्शन' आपल्याला घडते. त्याच्याबरोबर मेहनत करून आपणही या शेतातून, मातीमधून मोती म्हणजेच धान्यरूपी अपार धन पिकवूया. आपल्या धरतीला सुलजाम् सुफलाम् बनवूया.

कवीने देशाच्या मातीवर अधिकार सांगून आपलेपणाची भावना दर्शवली आहे. फुलेमुले, तनमन हे सामासिक शब्द वापरले आहेत. धान्याला 'शेतातील मोती' हे रुपक दिले आहे. श्रावण, तनमन, सुदर्शन या शब्दांचे 'अ' कारान्ती यमक साधून काव्यसौंदर्य खुलवले आहे.

## विभाग ३ – स्थूलवाचन

उ.३. (१) **खालील कोणत्याही दोन कृती सोडवा.**

**टिपा लिहा.**

**व्युत्पत्ती कोशाचे कार्य -** वाचन करताना अनेक वेगवेगळे शब्द डोळ्यांखालून जातात. काही शब्द लक्ष वेधून घेतात. हे शब्द कसे तयार होत असावेत याची उत्सुकता निर्माण होते. मग अशावेळेस त्या शब्दाची निर्मिती कशी झाली हे पडताळण्यासाठी व्युत्पत्ती कोश उपयोगी पडतो. व्युत्पत्ती कोश शब्दाचे मूळ रूप दाखवतो. इतकेच नव्हे तर त्यातील विस्तार संदर्भ, उच्चारातील बदल व फरक दाखवतो. याची उत्पत्ती पाहणे, उच्चार जाणून घेणे ही भाषासमृद्धीच्या दृष्टीने आनंददायी क्रिया आहे. एकाच शब्दाचे वेगवेगळ्या परिस्थितीमध्ये वेगवेगळे अर्थ असतात, हे जाणून घेणे अत्यंत महत्त्वाचे आहे. उदा. धूळ चारणे; खरे पाहता धूळ चारणे व फसवणे हे दोन अर्थ आहेत. वेगवेगळ्या संदर्भानुसार ते ते अर्थ जुळवले जातात. व्युत्पत्ती कोशातून उच्चारातील बदलांचे कारण स्पष्ट होते. अर्थातील स्पष्ट केलेला बदल अभ्यासता येतो. व्युत्पत्ती कोशातून एखाद्या शब्दाची अन्य कोणी मांडलेली व्युत्पत्ती सांगून ती योग्य व अयोग्य हे ही कळते. भाषेचे कालिक स्वरूप स्पष्ट करणे हे व्युत्पत्ती कोशाचे प्रमुख कार्य आहे. 3

(२) **खालील मुद्द्यांवर एक परिच्छेद तयार करा. (७ ते ८ वाक्यांत)** 3

१९३८ साली मुंबई येथे अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलन भरले होते. स्वातंत्र्यवीर सावरकर या संमेलनाचे अध्यक्ष होते. 'व्युत्पत्ती कोश रचनेचे कार्य हाती घ्यावे' असा ठराव संमेलनात मंजूर करण्यात आला. सर्वांच्या मतानुसार हे कार्य कृ. पा.कुलकर्णी यांच्यावर सोपविण्यात आले. बॅ. मुकुंदराव जयकर यांच्या आर्थिक सहकार्यामुळे व श्री. दाजीसाहेब तुळजापूरकर यांनी पुरस्कृत केल्यामुळे व्युत्पत्ती कोश निर्मितीस भरीव मदत झाली. तसेच सर्वांच्या सहकार्यामुळे १९४६ साली 'मराठी व्युत्पत्ती कोशाचे' पहिले प्रकाशन झाले.

(३) 'जगणं कॅक्टसचं' या पाठात 'वसंत शिरवाडकर' यांनी वाळवंटी प्रदेशातील कॅक्टसवर विशेष माहिती दिली आहे. निसर्ग हा मोठा जादूगार आहे हे पटवून दिले आहे. साधारणपणे पाण्याशिवाय वनस्पती जगू शकत नाही. वाळवंटात अगदीच थोडे पाणी मिळते. पण निसर्ग एक जादूगार आहे. त्या थोड्याशा पाण्यातही तो वनस्पती फुलवतो. तेथील प्राणी जगवतो. वाळवंटी प्रदेशातील खास अशी जीवसृष्टी आहे. वनस्पती व प्राणी तेथेही जगू शकतात. कॅक्टसच्या झाडांवरची लाल-पिवळी फुले चित्रमय वाटतात. वाळवंटातील जीवनसृष्टी हा खरोखर पृथ्वीवरचा एक चमत्कारच आहे. त्यामुळेच प्रतिकूल परिस्थितीतही जीवसृष्टी निर्माण करणारा निसर्ग खरेच मोठा जादूगार आहे. 3

## विभाग ४ – भाषाभ्यास

उ.४ **(अ) भाषाभ्यासावर आधारित कृती**

(i) **समास** 2

**खालील तक्ता पूर्ण करा.**

| अ.क्र. | सामासिक शब्द | विग्रह | समासाचे नाव |
|---|---|---|---|
| (i) | **नापसंत** | पसंत नसलेला | अव्ययीभाव समास |
| (ii) | **पाऊसपाणी** | पाऊस, पाणी वगैरे | समाहार द्वंद्व समास |

(ii) **अलंकार** 2

**खालील उदाहरण वाचून कृती करा.**

| उपमेय | उपमान | साम्यवाचक शब्द | समान धर्म (गुण) |
|---|---|---|---|
| तुझी माया | आभाळ | गत | - |

(iii) **वाक्यरूपांतर**

**कंसातील सूचनेप्रमाणे वाक्य परिवर्तन करून लिहा.**

१. एकटा माणूस कमी काम करू शकतो. 1

२. अनेक ठिकाणी उसवलेल्या स्वेटरमधून थंडी चांगलीच जाणवत नव्हती का? 1

| | | |
|---|---|---|
| (iv) | **सामान्यरूप**<br>**दिलेल्या शब्दांचे मूळशब्द व सामान्यरूप असे वर्गीकरण करा.** | **2** |

| **क्र.** | **दिलेला शब्द** | **मूळशब्द** | **सामान्यरूप** |
|---|---|---|---|
| (१) | **शिक्षकांनी** | शिक्षक | शिक्षकां |
| (२) | **पुस्तकात** | पुस्तक | पुस्तका |

| | | |
|---|---|---|
| (v) | **वाक्प्रचार**<br>**खालील वाक्यांत कंसातील वाक्प्रचारांचा योग्य उपयोग करून वाक्ये पुन्हा लिहा.** | |
| | १. पैशाच्या घोटाळ्यामुळे अनिशची ऑफिसमधून **हकालपट्टी झाली.** | **1** |
| | २. काही कामांमुळे संध्याकाळी मला ओंकारेश्वरला जायला **उसंत लाभली नाही.** | **1** |
| उ. ४ | **(ब) स्वाध्यायावर आधारित कृती.** | |
| (१) | **शब्दसंपत्ती** | **1** |
| (i) | **समानार्थी शब्द लिहा.**<br>१. वाट - मार्ग, रस्ता     २. रसना - जीभ | |
| (ii) | **विरुद्धार्थी शब्द लिहा.**<br>१. छोटे × [मोठे]     २. मित्र × [शत्रू] | **1** |
| (iii) | **खालील शब्दसमूहासाठी एक शब्द लिहा.**<br>पैसे कर्जाऊ देणारा - सावकार | **1** |
| (iv) | **एका शब्दाचे भिन्न अर्थ लिहा.**<br>[पाय] ← पद → [हुद्दा] | **1** |
| (२) | **लेखननियमांनुसार लेखन** | |
| (i) | **अचूक शब्द ओळखून लिहा.** | |
| | १. लिंबोणी | ½ |
| | २. कवयित्री | ½ |
| (ii) | **खालील वाक्य लेखननियमानुसार शुद्ध करून लिहा.**<br>**आयुष्याच्या** उभारणीसाठी मला याच शाळेने आणि याच शिक्षकांनी भरपूर **शिदोरी** दिली. | **1** |

(३) **विरामचिन्हे**

**खालील वाक्यात योग्य विरामचिन्हांचा वापर करून वाक्ये पुन्हा लिहा.**

१. मी म्हटले, ''बाबा, तुम्ही मला ओळखले ?'' 1

२. ''या शाली घेऊन घेऊन मी आता 'शालीन' बनू लागलो आहे.'' 1

(४) **पारिभाषिक शब्द**

**खालील शब्दांना पारिभाषिक शब्द लिहा.**

१. Academic Qualification - शैक्षणिक अर्हता/ शैक्षणिक पात्रता ½

२. Bio-data - स्व-परिचय ½

(५) **भाषिक खेळ**

**खालील शब्द अकारविल्हेनुसार लावा.** 1

आयोजन, उपमा, परीक्षा, लढाई

## विभाग ५ – उपयोजित लेखन

उ.५ **अ. खालील कृती सोडवा.**

(१) **पत्रलेखन** 5

दि. २७ जानेवारी, २०१८

प्रति,

आयडियल ग्रंथ भांडार,

महात्मा गांधी रोड,

दादर (प.), मुंबई.

**विषय** – शालेय ग्रंथालयासाठी पुस्तकांची मागणी.

माननीय महाशय,

सप्रेम नमस्कार.

मी अ. ब. क., 'सरस्वती विद्यालय' या शाळेतील विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने मुख्याध्यापकांच्या संमतीने हे पत्र लिहीत आहे. आमच्या शाळेच्या ग्रंथालयासाठी खालील पुस्तकांची आवश्यकता आहे. तरी कृपया ती पुस्तके शाळेच्या पत्त्यावर त्वरीत पाठवून द्यावीत. सोबत पुस्तकांचे देयक (बिल) पाठवावे. जेणेकरून पुस्तकांची रक्कम त्वरीत देण्याची व्यवस्था करता येईल.

**पुस्तकांची यादी पुढीलप्रमाणे :**

| **क्र.** | **पुस्तकाचे नाव** | **लेखकाचे नाव** | **प्रती** |
|---|---|---|---|
| १ | शिवछत्रपती | श्री. बाबासाहेब पुरंदरे | ०५ |
| २ | बटाट्याची चाळ | पु. ल. देशपांडे | १० |
| ३ | स्वामी | रणजित देसाई | ०७ |
| ४ | यश तुमच्या हातात | शिव खेरा | ०५ |

वरील पुस्तके विद्यार्थ्यांसाठी असल्यामुळे कृपया पुस्तकांवर योग्य ती सवलत द्यावी, ही नम्र विनंती.

कळावे, तसदीबद्दल क्षमस्व.

आपला विश्वासू,
अ. ब. क.
विद्यार्थी प्रतिनिधी
सरस्वती विद्यालय,
जोगेश्वरी (प.), मुंबई.

(ii) दि. १६ जानेवारी,२०१८
प्रति,
आयडियल ग्रंथ भांडार,
महात्मा गांधी रोड,
दादर (प.), मुंबई.
**विषय –** ग्रंथालयासाठी पुस्तकांवर विशेष सवलत दिल्याबद्दल आभार.
माननीय महाशय,

सप्रेम नमस्कार.

मी अ. ब. क., 'सरस्वती विद्यालय' या शाळेतील विद्यार्थी प्रतिनिधी या नात्याने मुख्याध्यापकांच्या संमतीने हे पत्र लिहीत आहे.

आपण ग्रंथालयासाठी विकत घेतल्या जाणाऱ्या पुस्तकांवर ३५% एवढी विशेष सवलत देत आहात. या उपक्रमाबाबत आपले खूप खूप आभार. या उपक्रमामुळे अनेक ग्रंथालयांना खूप सारी पुस्तके खरेदी करता येतील. वाचकांनासुद्धा त्यामुळे अनेक पुस्तके वाचायला मिळतील. साहित्य वाचनाची गोडी निर्माण होईल. पुन्हा एकदा आपले मन:पूर्वक आभार.

कळावे, तसदीबद्दल क्षमस्व.

आपला विश्वासू,
अ. ब. क.
विद्यार्थी प्रतिनिधी,
सरस्वती विद्यालय,
जोगेश्वरी (प.), मुंबई.

(२) **सारांश लेखन** 5

**खालील उतारा वाचा व त्याचा एकतृतीयांश एवढा सारांश तुमच्या शब्दांत लिहा.**

आपला देश शेतीप्रधान असल्यामुळे खेड्यांची रचना वैशिष्टपूर्ण आहे. या रचनेत विविध परस्परावलंबी स्तर असतात. ग्रामरचनेचा आधार भूमी असल्याने शेती व शेतकरी हे मुख्य आधारभूत घटक असतात. शेतकऱ्याला उपयोगी पडणारे महत्त्वाचे बलुतेदारदेखील गावात असतात.

| | | |
|---|---|---|
| उ. ५ (१) | **आ. खालील कृती सोडवा.**<br>**जाहिरात लेखन**<br>**खालील जाहिरात वाचून त्याखाली दिलेल्या कृती करा.**<br>१) चौकट पूर्ण करा.<br>(i) जाहिरातीचा विषय – गिर्यारोहणाची जाहिरात<br>(ii) आयोजक – मनिष भोसले | 1<br>1 |
| | २) गिर्यारोहण मोहिमेची वैशिष्ट्ये<br>(i) पूर्वनियोजित गिरीभ्रमण (iii) उपकरणे उपलब्ध<br>(ii) राहणे, जेवण मोफत (iv) गट पद्धती | 2 |
| | ३) नाव लिहा.<br>आयोजक संस्था - पंचम हायकर्स | 1 |
| | ४) पंचम हायकर्सचा पत्ता - १ २ २, डॉ. परांजपे मार्ग, शिवाजीनगर, पुणे. | 1 |
| (२) | **कथा लेखन**<br>**खाली दिलेल्या मुद्द्यांवरून कथा तयार करा. कथेला योग्य शीर्षक द्या.**<br>**फेड**<br>विचित्रपूर नावाच्या राज्यात विचित्रवीर नावाचा राजा राज्य करीत होता. राजा फारच लहरी होता. कुठलाही निर्णय तो अचानक घेत असे. त्यामुळे सारे दरबारी त्याला फार घाबरत असत.<br>विचित्रवीर राजाकडे अनेक गुलाम होते. या गुलामांना तो खूप छळत असे. छोट्या छोट्या चुकांसाठीही तो गुलामांना जबर शिक्षा देत असे. असेच एकदा राम नावाच्या गुलामाकडून छोटासा अपराध घडला. झाले! विचित्रवीराने स्वभावानुसार त्याला फाशीची शिक्षा ठोठावली. राम खूप घाबरला. त्याला तुरुंगाकडे घेऊन जात असताना राम सैनिकांना मारून पळून गेला. तो थेट रानात गेला. तेथे एका गुहेत त्याने लपण्यासाठी आसरा शोधला; पण हाय रे दुर्दैव! ती गुहा एका सिंहाची होती.<br>थोड्या वेळानंतर सिंहाचे गुहेत आगमन झाले. सिंहाला पाहून रामची भीतीने गाळणच उडाली. त्याने पाहिले की सिंह एका पायाने लंगडतो आहे. कारण त्याच्या पायात काटा रुतलेला होता. त्यामुळे सिंह वेदनेने व्याकूळ झाला होता. थोडी हिंमत करून राम पुढे गेला आणि त्याने सिंहाच्या पायातील काटा काढला. सिंहाला बरे वाटले. त्याने रामला काहीही केले नाही.<br>दुसऱ्या दिवसापर्यंत सिंहाची जखम बरी झाली होती. तो शिकारीला बाहेर पडला. थोड्याच वेळात रामचा शोध घेणारे सैनिक त्या गुहेपर्यंत आले. त्यांनी रामला पकडले व पुन्हा राजाकडे आणले. नंतर संतापलेल्या विचित्रवीर राजाने त्याला भुकेलेल्या सिंहाच्या पिंजऱ्यात टाकण्याची शिक्षा दिली. राम खूपच घाबरला होता. तो ओरडून राजाची माफी मागत होता. पण रामकडे कुणीच लक्ष दिले नाही. ओरडणाऱ्या | 6 |

रामला सैनिकांनी पिंजऱ्यात टाकले. सर्वांना वाटले, आता सिंह रामला मारून खाणार; पण काय आश्चर्य! सिंहाने रामला मारणे तर दूरच, पण तो रामचे पाय चाटू लागला. वास्तविक हा सिंह म्हणजे दुसरा तिसरा कोणी नसून रामने ज्याच्या पायातील काटा काढून मदत केली होती तोच सिंह होता. सर्वजण हे दृश्य आश्चर्याने पाहत होते.

उ.५ **इ. लेखनकौशल्य**

**खालील लेखनप्रकारांपैकी कोणतीही एक कृती सोडवा. (१०० ते १२० शब्द)** **8**

(१) **हिमालयाचे आत्मवृत्त**

हो, मी हिमालय बोलतोय. जगातील सर्वात उंच पर्वत, भूलोकीचा स्वर्ग, देवांचे निवासस्थान, पृथ्वीचा मानदंड ! मीच भारतीय संस्कृतीचा जन्मदाता आहे. भारताचा इतिहास हा माझा इतिहास आहे. भारताचा गौरव हा माझा गौरव आहे. भारताच्या उत्तरेला २४०० किमीपेक्षाही जास्त माझा विस्तार आहे. माझी जन्मतिथी मला आठवत नाही. पण हो, इतके अवश्य आठवते की, वर्षानुवर्षे मी भारताचे रक्षण करत आलो आहे. असे ऐकण्यात आले होते की, एकदा चीनने भारतावर आक्रमण केले होते. कारण त्यांना माझ्यावर अधिकार गाजवायचा होता पण महान परंपरा असलेल्या या भारत देशाने त्यांच्या या आव्हानाला सडेतोड उत्तर दिले. माझ्या उंचीमुळे उत्तरेकडील अतिथंड वारे रोखले जाऊन भारतीय उपखंड सर्वकाळ उष्ण उबदार राहण्यास मदत होते. मी जर नसतो तर भारत वैराण झाला असता. खरंच मी भारताचा रक्षक आहे.

माझ्या मस्तकावर बर्फाचा सुंदर मुकूट आहे. एव्हरेस्ट, गॉडवीन, कांचनगंगा, लॉन्स, नंदादेवी ही माझी मुख्य शिखरे आहेत. यात एव्हरेस्ट सर्वांत उंच शिखर आहे. काही वर्षांपूर्वी शेरपा तेनसिंग नोर्के आणि एडमंड हिलेरीने माझ्या या शिखरावर प्रथम पदार्पण केले आणि अपूर्व यश मिळवले. त्यांच्या या साहसाचे मी अभिनंदन करतो. माझ्या अंगाखांद्यावर अनेक प्रकारच्या औषधी वनस्पती आहेत. मी तऱ्हेतऱ्हेच्या वृक्षांचा जन्मदाता आहे. माझ्या छायेत सिमला, मसूरी, नैनीताल, दार्जिलिंग इ. थंड हवेची ठिकाणे वसलेली आहेत. गंगा, यमुना, ब्रह्मपुत्रा इ. नद्यांचा जन्मदाता मीच आहे. जगातील जवळपास १५० कोटी लोकांसाठी पाण्याचा मुख्य स्त्रोत मीच तर आहे. माझ्यात साधारणपणे जवळपास १५००० विविध हिमनद्या आहेत, ज्यात १२००० वर्ग किमी इतके पाणी सामावले आहे. उत्तरांचलमधील गंगोत्री, यमुनोत्री, पिडारी, काफनी तर नेपाळमधील एव्हरेस्टच्या सान्निध्यातील 'खूंबू' या माझ्या काही प्रसिद्ध हिमनद्या आहेत.

मी भारतीय संस्कृतीचा पिता आहे. आर्यांचे आदिस्थान मीच आहे. फार पूर्वीच्या काळात ऋषीमुनींनी येथेच तपश्चर्या केली होती. वाल्मिकी ऋषींनी 'रामायण' आणि व्यासांनी 'महाभारत' माझ्यात कुशीत रचलेले होते. चंद्रगुप्त राजाने आपल्या राष्ट्रोद्धाराचे चिंतन माझ्यात छायेत केले होते. पांडवांनी येथूनच स्वर्गारोहण केले होते.

मी माझ्या महानतेचे गुणगान कुठपर्यंत करू ? मी इतका विशाल आहे की, संसाराचे सर्व दुःख माझ्यात सामावले जाईल. मी इतका शीतल आहे की सर्व प्रकारच्या चिंतेचा अग्नी शांत करू शकतो. मी इतका उंच आहे की, मोक्षप्राप्तीची शिडी बनवू शकेल आणि मी इतका धनाढ्य आहे की सर्व देवांत श्रीमंत असलेल्या कुबेरालासुद्धा आश्रय देऊ शकतो.

अहो, भारतवासियांनो ! हजारो वर्षांपासून तुमचा आणि माझा संबंध आहे. संपूर्ण जगाला सांगा की, 'हिमालय आमचा आहे.' घाबरू नका, मी तुमची सेवा, संरक्षण आणि मदत करण्यासाठी सदैव तत्परतेने उभा आहे.

(२) **मला देव भेटला तर...** 8

'देव जरी मज कधी भेटला,
माग हवे ते माग म्हणाला,
म्हणेन प्रभू रे माझे सारे,
जीवन देई मम बाळाला ।'

चित्रपटातील हे सुमधुर गीत आकाशवाणीवर ऐकताना माझ्या मनात अशी रम्य कल्पना स्फुरली की खरोखरच मला देव भेटला तर काय बहार येईल... तेवढ्यात आवाज आला, 'तथास्तु'.

मी क्षणभर अवाक्च झालो, क्षणभर सुचेना, काय करावे ? देव तर प्रत्यक्ष समोर मंद हास्य करत उभे राहिलेले. मला गोंधळलेले पाहून हसतच म्हणाले, 'बोल वत्सा, काय हवंय तुला ?' त्यांच्या दिव्य तेजाने मी दीपून गेलो. थोडे सावरताच मनातील सर्व प्रश्न विचारू लागलो, 'देवा, आम्ही सगळी तुझी लेकरे असताना समाजात अशी विषमता, भेदभाव का ? कोणी काळा, कोणी गोरा तर कोणी श्रीमंत तर कोणी गरीब का ? का सगळे स्वार्थासाठी आपापसात भांडतायत, एकमेकांचा जीव घेतायत, सांग देवा, सांग, हे असं का ?

देव गालातल्या गालात हसतच मला म्हणाले, 'अरे मूढा ! मी फक्त माणूस घडवला पण भेद तर तुम्हीच निर्माण केलेत. तुम्हीच एकमेकांच्या जीवावर उठलात. परंतु त्याचे खापर मात्र तुम्ही माझ्या डोक्यावर फोडताय. अरे ! मी दगडरूपी मूर्तीत नाही तर हृदयरूपी देव्हाऱ्यात वसतो. मी संगमरवरी मंदिरात नाही तर कष्टकऱ्यांच्या शेतात राहतो. घंटानादाच्या निनादात नाही तर तुमच्या मेहनतीत रमतो. पण तुम्हीच मला देव्हाऱ्यात कोंडलय, स्वत:च्या फायद्यासाठी. श्रम न करता तुम्हांला सगळं हवं म्हणून तुम्ही नवस बोलता, वेळेला लाच देण्याचा प्रयत्न करता. मी तुम्हांला जन्माला घातलं ते या सुंदर सृष्टीमध्ये नंदनवन फुलवण्यासाठी पण त्याठिकाणी तुम्ही अनेक धर्म निर्माण केले. त्यासाठी वेगवेगळ्या रूपात येऊन मी तुम्हांला मार्गदर्शन केलं. तुम्ही त्याचा स्वार्थासाठी उपयोग करताय हा काय माझा दोष आहे ? म्हणजे तुमचं हे बरं आहे.'

'विनाशकाले विपरित बुद्धी' या उक्तीप्रमाणे मानवाने स्वत:च आपला विनाश ओढवून घेतला आहे. जन्मदात्या मातेला ती स्त्री आहे म्हणून अधर्माने तिच्या प्रगतीला अडविले आहे. स्पृश्य-अस्पृश्यतेच्या भिंती उभ्या केल्या, मंदिर-मस्जिद वाद रंगविले. नाव मात्र दिलेत धर्माचे पण बदनाम केलेत ते देवाला. सुखात नाही तर फक्त दु:खात देवाची तुम्हांला आठवण येते. स्वार्थासाठी अगदी आमची विटंबना करायलाही तुम्ही धजावता. सत्तेच्या लोभापायी युद्ध करता. शांततेसाठी व विकासासाठी दिलेली अणुऊर्जा विनाशकारी बॉम्ब बनवण्यास वापरून प्रचंड जीवितहानी घडवून आणता. अगदी स्टार वॉरची योजना आखता व मौल्यवान खनिजांचा दुरूपयोग करता. पण लक्षात ठेवा, यात विनाश तुमचाच आहे. वाढत्या जागतिक तापमानाची दखल घ्या नाहीतर विनाश अटळ आहे.

'नको मंत्र मला मुनीब्राह्मणांचे, मला आवडे गीत श्वासाघणांचे
वसतो सदा मी स्वेद गंगेकिनारी, जिथे राबती हात तेथे हरी ।'

''तेव्हा स्वार्थी माणसा जगाच्या कल्याणासाठी स्वार्थ सोडून दे.'' एवढं बोलून देव मला प्रश्नांच्या गर्तेत लोटून अंतर्धान पावले.

'तोचि करता आणि करविता' या उक्तीप्रमाणे त्या देवावरच सगळं सोपवून मी समर्थांच्या ओळी मनात घोळवू लागलो,

'राघवाचा धर्म जागो, अधर्म रे भागो,
अज्ञान निरसुनिया, विज्ञान लक्ष लागो।।'

❖❖❖❖❖